# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

**(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)**

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १५/०४/२०२०

(ई-मेलने/टपालाने) आपत्ती प्राधान्य

वाचाः-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र./करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १३/०३/२०२०, दिनांक १४/०३/२०२० आणि दिनांक १५/०३/२०२०.

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक ३१/०३/२०२०, १३/०४/२०२०.

## आदेश

ज्या अर्थी, सध्या महाराष्ट्रात नोव्हेल करोना विषाणू (nCoV-19) संसर्ग बाधित रुग्ण मोठ्या प्रामणात आढळत आहेत. करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोन विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, शासनाच्या दिनांक १४/०३/२०२० च्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम, २०२० लागू केला आहे.

त्या अर्थी **मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** असे आदेश देत आहे की, ''जालना जिल्हयातील ग्रामीण / नागरी क्षेत्राजवळील भागांमध्ये शेती व पिण्याचे पाणी पूरवठा सूरळीत राहण्याच्या अनुषंगाने नवीन बोअरवेल घेणे, बोअरवेल दुरुस्ती व यासाठी वापरण्यांत येणारे यंत्र व वाहने यांना अत्यावश्यक बाब म्हणून वरील काम करणेस परवानगी देण्यात येत आहे.''

उपरोक्त आदेशांचे पालन न करणा-या व्यक्ती, अधिकारी/कर्मचारी, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ आणि भा.द.वि. १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यात येईल आणि पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय जालना

Raut

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

15/4/2020

**प्रतिलीपी:-**

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

३. पोलीस अधिक्षक, जालना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पूरवठा अधिकारी, जालना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

५. सर्व उपविभागीय अधिकारी/सर्व तहसिलदार,जि.जालना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

६. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालीका विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

७. सर्व मुख्याधिकारी, न.पा./न.प. जिल्हा जालना यांना आदेशात नमूद केले प्रमाणे कार्यवाहीसाठी.

८. जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय, जालना यांना प्रसिध्दीस्तव.